● Date of Publication : सोमवार, १२ फेब्रुवारी २०१८, ● Posted at Market yard PSO Pune Daily.
आर.एन.आय. MAHMAR/2005 रजि. नं. PCW/081/2018-2020/RNI No.14922

# देशाला पर्याय देण्याची स्थिती असेल तर पाठिंबा

## शरद पवार यांनी कोल्हापुरात मांडली भूमिका


शरद पवार

**कोल्हापूर :** व्यक्तिगत सलोखा व राजकीय संबंध यात फरक आहे. माझी राजकीय भूमिका स्वच्छ आहे. महाराष्ट्राच्या आणि भारताच्या हिताचा विचार करणारे लोक एकत्र येत असतील आणि त्यांच्या माध्यमातून राज्याला तसेच देशाला पर्याय देण्याची स्थिती असेल तर या गोष्टींना माझ्यासारख्याचा मनापासून पाठिंबा असेल, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष व माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी शनिवारी (ता.१०) येथे स्पष्ट केली.

माजी खासदार कै. सदाशिवराव मंडलिक स्मृती पुरस्कार वितरण कार्यक्रमात बोलताना पवार म्हणाले, ''माझ्या मनात काय हे माझ्या पक्षातल्या सगळ्या लोकांना कळते, मी वेगवेगळ्या पक्षांच्या लोकांशी मैत्री करतो, मैत्रीचे संबंध ठेवतो. शिवसेनेचे कै. बाळासाहेब ठाकरे माझे जवळचे मित्र. पण ठाकरेंच्या उमेदवाराला मी कधीही पाठिंबा दिला नाही आणि त्यांनीही कधी आमच्या उमेदवाराला पाठिंबा दिला नाही. आमची राजकीय 'लाइन' ठरलेली असते.'' आजचे चित्र बघितल्यानंतर देशाच्या पातळीवर ज्या परिवर्तनाची आवश्यकता आहे, त्यात जे जे सहभागी होतील, त्यांच्यासोबत जाण्याची भूमिका आपली असेल, असेही पवार यांनी नमूद केले.

# सेना, राष्ट्रवादीकडून राणेंना आवतन?

मुंबई : नारायण राणे यांनी स्थापन केलेला नवा पक्ष आता बाळसे धरू लागला आहे. पक्ष विस्ताराच्या अनुषंगाने राणे व त्यांच्या कार्यकर्त्यांनी कंबर कसली आहे. त्या अनुषंगानेच राणे यांच्या या पक्षात येण्यासाठी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही जण प्रयत्न करीत असल्याचे सूत्रांनी सांगितले.

शिवसेनेतील एका पुढाऱ्याने राणे यांची भेट घेऊन पक्ष प्रवेशाबाबत चर्चा केल्याचे या सूत्रांनी सांगितले. आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकीमध्ये भाजप व शिवसेनेची युती होण्याची कोणतीही शक्यता नाही. राणे यांचा महाराष्ट्र स्वाभिमान पक्ष अगोदरच 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'मध्ये सहभागी झालेला आहे. त्यावेळी राणे यांच्या पक्षासाठी भाजपकडून काही जागा सोडल्या जातील. युती झाल्याने या जागांवर यश मिळण्याच्या आशा आहेत. भविष्यातील ही गणिते लक्षात घेऊनच राणेंशी चर्चा सुरु असल्याचे सूत्रांनी सांगितले.

# नगर जिल्हा विभाजन राष्ट्रवादीला मान्य

## घुले यांनी केले स्पष्ट; चर्चेला वेग, राजकीयांच्या भुवया उंचावल्या

सूर्यकांत नेटके

नगर : नगर जिल्ह्याच्या विभाजनाच्या चर्चेला वरचेवर वेग आहे. जिल्हा विभाजन होण्याला नागरिकांचीही पसंती आहे. मात्र त्याकडे राजकारण म्हणूनही पाहिले जात आहे. असे असताना राष्ट्रवादी काँग्रेसने 'निर्णय मान्य असेल' असे सांगून अप्रत्यक्षपणे जिल्हा आणि तालुका विभाजनाला सकारात्मकता दार्शवल्याने नगर जिल्ह्यामध्ये अनेक राजकीयांच्या भुवया उंचावल्या आहेत.

नगर जिल्ह्याचे विधानसभा व लोकसभा निवडणुकीच्या आधी विभाजन करणार असल्याचे काही दिवसांपूर्वी वक्तव्य केल्याने राजकीय, सामाजिकांसह लोकांच्या भुवया उंचावल्या. त्यानंतर काही दिवसांत नगरला आलेल्या महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही 'नगरसह राज्यातील अन्य जिल्ह्यांचे व तालुक्यांचे विभाजन करण्याला सकारात्मकता दर्शवली होती. ''जिल्हा विभाजनासंबंधीचा अहवाल आला आहे, अहवाल पाहून जिल्हा आणि आवश्यक तेथे तालुका विभाजनाबाबत लोकभावनेवर निर्णय घेणार आहे'' असे स्पष्टपणे सांगून टाकल्याने जिल्हा विभाजन होणार हे नक्की झाल्याचे लोकांत बोलले जात आहे. त्यात आज (रविवारी) पत्रकारांशी संवाद साधताना ''जिल्हा आणि तालुके विभाजनाचा निर्णय राष्ट्रवादीला मान्य असेल' असे स्पष्टपणे सांगून टाकल्याने राजकीय नेत्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

नगर जिल्ह्याच्या विभाजनाचा विषय तसा अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. जिल्हा विभाजन झाले तर राजूर (अकोले), तीसगाव (पाथर्डी), बोधेगाव (शेवगाव), देवळाली प्रवरा (राहुरी) निघोज (पारनेर), सोनई (नेवासा) ही प्रमुख बाजारपेठांच्या गावांना तालुक्याचा दर्जा मिळावा ही मागणी आहे. जिल्हा विभाजनाला जिल्ह्यामधील बहुतांश भागांतील लोकांचा पाठिंबा असला तरी राजकीय इच्छाशक्ती नसल्याचे सातत्याने जाणवले आहे. पालकमंत्री राम शिंदे यांनी जिल्हा विभाजनावर केलेल्या भाष्यानंतर विधानसभेतील विरोधीपक्ष नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिंदे यांच्या वक्तव्याची खिल्ली उडवली.

जिल्ह्याच्या दक्षिणेत बाळासाहेब थोरात, राधाकृष्ण विखे पाटील, मधुकर पिचड, यशवंतराव गडाख या मातब्बर नेत्यांचे वर्चस्व आहे. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर घुले यांचा भागही उत्तरेशीच निगडित असल्यासारखे आहे. दक्षिणेच्या तुलनेत उत्तरेतील शेती, सहकारही अधिक बळकट आहे. सिंचनाचे क्षेत्र जास्त असल्याने प्रगत भाग आहे. जिल्ह्यामधील दुष्काळी तालुके दक्षिणेत आहेत. पालकमंत्री राम शिंदे व माजी मंत्री बबनराव पाचपुते हे दोन प्रमुख नेते दक्षिणेतील असले, तरी उत्तरेच्या तुलनेत दक्षिण जिल्ह्यांमध्ये विकास झालेला नाही. त्यामुळे जिल्हा विभाजन झाले तर दक्षिणेला न्याय मिळेल, असे लोकांना वाटत आहे. मात्र जिल्हा विभाजनाचा विषय राजकीय सबंधाशी जोडला जात आहे.

जिल्हा विभाजन ही भाजपची खेळी असल्याचे काही राजकीय मंडळी उघडपणे बोलत असताना, राष्ट्रवादीने मात्र जिल्हा आणि तालुका विभाजनाचा निर्णय मान्य असल्याचे सांगून टाकल्याने अनेक राजकीयांच्या भुवया उंचावल्या आहेत.

### अजून अनेकांच्या भूमिका अस्पष्ट

नगर जिल्ह्याचे विभाजन होणार, मात्र मुख्यालय कोठे असेल हे स्पष्ट नाही. जिल्हा विभाजन करावे ही लोकांची मागणी असल्याचे लपून राहिलेले नाही. पालकमंत्र्याच्या वक्तव्यानंतर राधाकृष्ण विखे यांचे एक आणि आज राष्ट्रवादीने स्पष्ट केलेली भूमिका वगळता अजून अन्य राजकीय नेत्यांनी भूमिका मांडलेली नाही. त्यामुळे जिल्हा विभाजनाबाबत कोणत्या नेत्यांची काय भूमिका आहे याकडेही लोकांचे लक्ष लागले आहे.

